स्थापना
१ मे १९५७
E:\2025-26\cctv\Jahirart.docx\1

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा.क्र./विकसन/सी.सी.टि.व्ही./मुख्य बा.आवार/देखभाल/दरपत्रके./२७५४ /२०२५-२६ दि१३/०२/२०२६

## प्रसिध्दीपत्रक

**विषय** - कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेचे मुख्य बाजार आवार येथे सी.सी.टि.व्ही. यंत्रणेची देखभाल दुरुस्ती कामाची दरपत्रके सादर करणेबाबत....

उपरोक्त विषयस अनुसरुन अनुभवी ठेकेदार यांना सुचित करणेत येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेचे मुख्य बाजार आवारामध्ये कार्यान्वित असलेल्या सी.सी.टि.व्ही. यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे कामकाजाचा ठेका १२ महिने कालावधीसाठी देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

सदर काम करणेसाठी खालील नियम व अटीचे अधिन राहुन आपले कमीत कमी दराचे सीलबंद दरपत्रक दि२०/०२/२०२६ अखेर दु.१.०० वाजेपावेतो संस्थेच्या मुख्य कार्यालयात सादर करावे.

## नियम व अटी

१. कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेचे मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७ येथिल मुख्य बाजार आवारामध्ये कार्यान्वित असलेल्या सी.सी.टी.व्ही. यंत्रणेचा वार्षिक देखभाल दुरूस्तीचा ठेका कार्यादेशाचे दिनांकापासून १ वर्ष (१२ महिने) कालावधीचा असेल.निविदा भरताना निविदाकाराने प्रति महिना सर्व प्रकारचे शासकीय करांसह अपेक्षित रक्कम यांचा उल्लेख करावा.

२. या ठेक्यामध्ये दुरूस्तीसाठी लागणाऱ्या साहित्याचा (मटेरिअल) समावेश नाही.

३. सदर कामासाठी १ वर्षे कालावधीची रक्कम रु.७,०४,०००/- एवढी निश्चित केलेली आहे. ज्या निविदाधारकास कार्यादेश मिळेल त्यांनी, कार्यादेश मिळालेनंतर १५ दिवसामध्ये रक्कम रूपये ५०,०००/- (रक्कम रूपये पन्नास हजार फक्त) एवढी रक्कमेचा धनादेश बाजार समितीकडे जमा करावा. सदरची रक्कम निविदा कालावधीनंतर बिनव्याजी परत करणेत येईल.

४. बाजार समितीने बसविलेली संपूर्ण बाजार आवारातील सी.सी.टी.व्ही. सुरक्षा यंत्रणेचे देखभाल दुरूस्तीचे कामकाज करणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच देखभाल दुरूस्तीचे कामाचे कॉल लॉग बुक ठेवणे बंधनकारक असेल.

५. सदर कामाचा ठेका मिळालेनंतर त्वरीत सी.सी.टी.व्ही यंत्रणेची पाहणी करून बंद / नादुरूस्त असलेले कॅमेरे, उपकरणे दुरूस्त / कार्यान्वित करून देणे ठेकेदारावर बंधनकारक असेल.बाजार समितीचा सर्व्हरची देखभाल दुरुस्ती व इंटरनेट सुविधा सर्व गेट व कार्यालयात सुरु ठेवणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल. अनुभवी ठेकेदारास प्राधान्य देणेत येईल.

६. देखभाल दुरूस्ती कामासंबंधी आवश्यक उपकरणे ठेकेदाराकडे उपलब्ध असणे आवश्यक असेल. तसेच फायबर ऑप्टीकल केबल जोडणे इ. कामाचे खर्चाचा ठेक्याचे रक्कमेत समावेश असेल.

७. संपूर्ण सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची अद्ययावत माहिती असलेल्या प्रशिक्षित **तज्ञ (तांत्रिक) सेवकासह** तीन कर्मचाऱ्यांची तीन पाळ्यांमध्ये (शिफ्टमध्ये) पुर्ण वेळ (२४ तास) नेमणुक करणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

८. संपुर्ण सी.सी.टी.व्ही. यंत्रणेमध्ये कोणताही तांत्रिक दोष अथवा त्रुटी आढळल्यास दोषदायित्व कालावधीमध्ये या कार्यालयाच्या निदर्शनास आणून देणे व त्याचे योग्य निराकरण करणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

९. सदर कामाच्या ठेक्यांतर्गत या कार्यालयाच्या अधिकारी / कर्मचारी यांना यंत्रणा हाताळणीचे प्रशिक्षण देणे व प्रशिक्षणावर देखरेख करणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

१०. नविन सॉफ्टवेअर / यंत्रणा बसवायचे निश्चित झाल्यास ते बसवून देणे व संबंधितांना त्याचे योग्य प्रशिक्षण देणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

११. सदर कामकाजाकरिता नेमलेले कर्मचारी गैरहजर राहिल्यास त्याचे जागी बदली कामगाराची तात्काळ नेमणुक करणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.बदली कामगाराची नेमणुक न केल्यास गैरहजेरीबाबत सरासरी एक दिवसाचे वेतनाच्या दुप्पट रक्कम कपात करणेत येईल.

१२. ठेकेदाराने सदर कामाची निविदा रक्कम नमूद करताना ती सर्व शासकीय कर व आकारांसहित असेल याची नोंद घ्यावी. निविदा रक्कमेव्यतिरिक्त कोणत्याही कराची रक्कम ठेकेदारास स्वतंत्रपणे देण्यात येणार नाही. तसेच नमूद ठेका रक्कमेमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ दिली जाणार नाही.

१३. ठेक्याचे कालावधीत ठेकेदाराचे हलगर्जीपणामुळे सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बंद राहून कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७

१४. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांस गणवेश व ओळखपत्र ठेकेदाराने देणे बंधनकारक राहील. तसेच नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची बाजार समितीचे अधिकारी / कर्मचारी व बाजार घटकांशी वागणुक सौजन्याची असावी.

१५. ठेकेदाराचे कामकाजासंबंधी आवश्यक ती माहिती घेण्याचा व सुचना देण्याचा अधिकार बाजार समितीचे अधिकारी / कर्मचारी यांना असेल व त्याचे पालन करणे ठेकेदार व त्यांनी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांवर बंधनकारक असेल.

१६. मंजुर झालेल्या निविदा धारकाची बयाणा रक्कम कराराची मुदत संपल्यानंतर बिनव्याजी शासकीय विविध कायद्याचे पालन केल्याचे शासकीय पत्र अथवा प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर सदरची रक्कम परत केली जाईल.

१७. निविदाधारकास त्याची निविदा मंजुर झाल्याची कळवून त्यात नमूद केलेल्या तारखेपासून काम पुर्ण झाल्यास विलंब केलेल्या तारखेपर्यंत प्रतिदिनी निविदेच्या एकुण रक्कमेमधुन सरासरी होणारी रक्कम कपात केली जाईल. तसेच पुढे ठेक्याचे काम सुरू न केल्यास योग्य त्या नुकसान भरपाईची रक्कम बयाणा रक्कमेमधुन किंवा अन्य मार्गाने वसूल केली जाईल.

१८. निविदा धारकाचे काम करणाऱ्या कामगारांना कोणताही अपघात, दुखापत, आजारीपण झाल्यास त्याची बाजार समितीवर कोणतीही जबाबदारी असणार नाही. ती सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची असेल.

१९. निविदाधारकांना सदरचा ठेका अन्य कोणास उपठेक्याने देता येणार नाही.

२०. ठेक्याची मुदत पुर्ण झाली असली तरी पुढील कालावधीचा ठेका दिला जाई पावेतो त्याच रक्कमेमध्ये ठेक्याचे कामकाज करण्याची जबाबदारी ठेकेदारांची असेल.

२१. एकदा मंजुर झालेल्या रक्कमेत कोणत्याही कारणास्तव वाढ दिली जाणार नाही. देण्यात आलेले काम योग्य प्रकारे पार पाडले जात आहे किंवा नाही या करिता बाजार समितीचे अधिकारी / कर्मचारी कामाची पाहणी करतील तसेच काही त्रुटी आढळून आल्यास सुधारणा करणेची एक संधी देण्यात येईल. मात्र सुधारणा न झाल्यास ठेका मुदतीपुर्वी रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही. मात्र अशा प्रसंगी नविन निविदाधारकांची नेमणुक करणे तसेच तद्नुषंगिक खर्चाची रक्कम ठेकेदारांच्या सुरक्षा ठेव रक्कमेतून कपात केली जाईल.

२२. नविन अट समाविष्ट करण्याचा किंवा जूनी अट रद्द करण्याचा हक्क बाजार समितीस असेल. कोणत्याही नियम अटीचा भंग केल्यास ठेका रद्द करून मर्जीनुसार कार्यवाही करण्याचा हक्क बाजार समितीने राखून ठेवला आहे.

२३. ठेकेदारांचे कामकाज बाजार समितीस असमाधानकारक वाटल्यास ठेका त्वरीत रद्द करण्याचा अधिकार बाजार समितीला असेल.

२४. या निविदेतील एखाद्या शब्दाचा, वाक्याचा किंवा नियम अटीच्या अर्थासंबंधी वाद निर्माण झाल्यास बाजार समितीचा निर्णय अंमित असेल.

२५. निविदा मंजुर झालेचे कळविलेनंतर ठेकेदाराने स्वखर्चाने बाजार समितीच्या विहित नमून्यात करारनामा करून दिला पाहिजे.

२६. ठेकेदाराने त्याची मासिक देयके सादर करताना देयका बरोबर देयक कालावधीतील केलेल्या कामाचे अहवाल जोडूनदर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर देयक तपासून बाजार समिती २० दिवसांच्या आत ठेकेदारास अदा करेल.

२७. ठेकेदारास महिन्याचे देयक अदा करते वेळेस देयकामधून नियमाप्रमाणे आयकर व इतर लागू असलेले कर कपात केले जातील व कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेने सदर कपात केलेल्या आयकराचा दाखला दिला जाईल.

२८. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बाजार समितीस असेल.

२९. वरील नियम व अटी मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

सचिव
**कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे**